(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. X / Issue – I ISSN 2277-8063

# भारताचे लुक ईस्ट धोरण

**डॉ. संजय गोरे** राज्यशास्त्र विभागप्रमुख, शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर, ता.कोरपना जि. चंद्रपूर (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :—**

राष्ट्रीय हित साध्य करणे आणि संवर्धित करण्याचे महत्वपूर्ण साधन म्हणून परराष्ट्र धोरणाचा उल्लेख केला जातो. परराष्ट्र धोरणाला अंतर्गत घटक आणि बाह्य घटक प्रभावित करीत असतात. या प्रभावाच्या अनुषंगानेच परराष्ट्र धोरण साकार होते. विविध कारणांमुळे बाह्य व अंतर्गत घटकात बदल होत असल्यामुळे परराष्ट्र धोरण कायम स्वरूपात स्थिर राहू शकत नाही. ते सतत गतिमान अवस्थेत असते. यासंबंधी रॉय मॅक्रिडिस म्हणतात की, ''विदेशनीतीच्या गतिमानतेमुळे त्याची कोणतीही व्याख्या परिपूर्ण नाही.''[१] परराष्ट्र धोरण गतिमान असण्याचे कारण म्हणजे राष्ट्रीय हिताच्या संकल्पनेला अनुरूप कांही अंतिम ध्येय व उद्दिष्ट्ये निश्चित केली जातात. ध्येय व उद्दिष्ट्ये ठरवितांना त्यावर अंतर्गत घटकांचा प्रभाव तर पडतोच, मात्र ती साध्य करीत असतांना त्यावर आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील बाह्य घटकांचाही प्रभाव पडत असतो. त्यामुळे अंतर्गत व बाह्य घटकांचा प्रभाव आणि आघात घटकांचे काळानुरूप संतुलन करून धोरणात सतत यथायोग्य बदल करणे आवश्यक ठरते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात अंतर्गत परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या अनुषंगाने स्थित्यांतरे झाली आहे. नवस्वतंत्र भारतातील परिस्थिती आणि द्वितीय महायुध्दोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था लक्षात घेवून भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत नेहरूंनी अलिप्ततावाद, पंचशील, जागतिक शांतता, नि:शस्त्रीकरण आणि तिसऱ्या जगाची बांधणी इ. तत्वाचा पुरस्कार केला. मात्र भारत—चीन युध्द, भारत—पाकिस्तान युध्दामुळे पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीनी भारताच्या परराष्ट्र धोरणात 'आदर्शवाद ते वास्तववाद' असा बदल घडवून आणला. त्याचाच एक भाग म्हणजे सोव्हियत रशियाशी २० वर्षाचा मैत्री करार केला. १९९० नंतर सोव्हियत रशियाचे झालेले पनन आणि देशावर आलेले आर्थिक संकट लक्षात घेवून पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहरावांनी खाऊजा आणि लुक ईस्ट धोरणाचा स्विकार केला. २१ व्या शतकात दक्षिण पुर्व आशियाई देशासोबत व्यापारी संबंध बळकट करण्याचा प्रयत्न पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी केला. तर या देशांसोबत आर्थिक, व्यापारी, उर्जा व संरक्षण क्षेत्रात संबंध प्रस्थापित करीत असतांना भागीदारी करण्याच्या धोरणाचेम्हणजे 'ॲक्ट ईस्ट' धोरणाचा स्विकार पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :—**

१) भारताने 'लुक ईस्ट' धोरण स्विकारण्यास कारणीभूत ठरलेल्या घटकांचा अभ्यास करणे.

२) भारताने स्विकारलेल्या 'लुक ईस्ट' धोरणाच्या विकासाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :—**

१) शीतयुध्दोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था आणि देशावर आलेले आर्थिक संकट यामुळे भारताने 'लुक ईस्ट' धोरणाचा स्विकार केला.

२) शीतुयध्दोत्तर काळात सत्तेवर आलेल्या पंतप्रधानांनी 'लुक ईस्ट' धोरणाचा विकास घडवून आणला आहे.

**तथ्याचे विश्लेषणात्मक निर्वचन :—**

I) शीतयुध्दानंतर भारतात सत्तेवर येणारे पहिले सरकार हे पी.व्ही. नरसिंहरावांचे होते. या सरकारने १९९१ ते १९९६ असा पाच वर्षाचा कार्यकाल यशस्वीपणे पूर्ण केला. या सरकारने भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील बदल लक्षात घेवून महत्वपूर्ण निर्णय घेतल्याचे दिसून येते. यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या स्वरूप व उद्दिष्टांत आमुलाग्र बदल होण्यास सुरूवात झाली. इ.स. १९९१ साली सोव्हीयत रशियाच्या पतनामुळे शीतयुध्द संपले.परिणामी अमेरिका ही जागतिक राजकारणातील एकमेव महासत्ता बनली. काही काळापूरते आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे स्वरूप हे एकध्रुवीय बनले. कालांतराने जगाच्या वेग—वेगळ्या भागात अनेक नवीन सत्ता केंद्राचा उदय झाला. त्यात प्रामुख्याने युरोपमध्ये रशिया व युरोपीयन संघ, आशियात चीन व जपान तर तिसऱ्या जगातून भारत, ब्राझील व दक्षिण आफ्रिका इ. क्षेत्रीय सत्ताकेंद्राचा उल्लेख करता येईल. यामुळे बहुध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था आकारास येवू लागली. या नवीन विश्वरचनेची काही महत्वपूर्ण वैशिष्ट्ये होती. ती म्हणजे आर्थिक हितसंबंधाना प्राधान्य, आंतरराष्ट्रीय सहकार्यामध्ये वाढ आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात आशियाई राष्ट्रांचे वाढलेले महत्व इ. राजकीय, आर्थिक, व्यापारी, सांस्कृतिक, विज्ञान—तंत्रज्ञान व व इतर क्षेत्रामध्ये द्विपक्षीय आणि विभागीय पातळीवरील सहकार्यात वाढझाली. भारताने सुध्दा या बदलत्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या अनुषंगाने आर्थिक हितसंबंधाला परराष्ट्र धोरणात स्थान दिले.

२० व्या शतकाच्या शेवटच्या दशकात आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत बदल होत असतांनाच देशांतर्गत पातळीवर भारताच्या आर्थिक धोरणात महत्वपूर्ण बदल झाले. कारण भारत गंभीर अश्या आर्थिक संकटात सापडला होता. परिणामी भारताला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बॅंकेने घालून दिलेल्या अटीनुसार खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा स्विकार करावा लागला. हा बदल भारतासाठी महत्वपूर्ण मानला जातो. याबाबत डॉ. बाल्डन बेला यांनी आपल्या 'काळाकुट्टविजय: अमेरीका आणि जागतिक दारिद्र्य' या पुस्तकात सविस्तर मत मांडले आहे. त्यांच्या मते, ''ज्या भारताने स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक स्वावलंबन,

योजनाबध्द विकास, कल्याणकारी राज्य, सार्वजनिक उद्योग व अलिप्ततावाद इ. मुलभूत बाबतीत आशिया—आफ्रिका खंडातील नवोदित विकासनशील देशांना नेतृत्व दिले, त्या भारताची शरणागती सोव्हियत रशिया च्या विघटना इतकीच एक ऐतिहासिक घटना मानली पाहीजे.''[२] एंकदरीत भारताच्या याबदलत्या आर्थिक धोरणाचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर पडला. म्हणजेच परराष्ट्र धोरणात व्यापार वाढीच्या धोरणाच्या स्विकार करण्यात आला. त्यामुळे परराष्ट्र धोरणातील आर्थिक राजनयाचे महत्व वाढले.

वरील बदलामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात 'लुक ईस्ट' या धोरणाचा स्विकार करण्यात आला. या बरोबर भारत — चीन यांच्यातील स्पर्धेचा एक महत्वपूर्ण परिणाम म्हणून धोरणाकडे पाहिले जाते. १९९१ नंतर भारताने दक्षिण — पूर्व आशियांतील देशांबरोबर संबंध सुधारण्यास प्राधान्य दिले. म्हणजे या देशांशी आर्थिक आणि व्यापारी संबंध वाढविणे हा लुक ईस्ट धोरणाचा मुख्य हेतू राहीला आहे. या धोरणातंर्गत भारताने आशियातल्या इतर राष्ट्रांमध्ये आर्थिक विकासाच्या संधी शोधण्यावर भर दिला. कारण १९६७ साली दक्षिण — पूर्व आशियातील राष्ट्रानी आसियान या संघटनेची स्थापना केली होती. आसियान या व्यापारी संघाच्या माध्यमातून दक्षिण—पूर्व आशियाई राष्ट्रांनी आर्थिक क्षेत्रात प्रगती केली होती. इ.स. १९९१ च्या शेवटी भारताला आसियानचा 'विभागीय वाटाघाटी (सल्लागार) भागीदार' चा दर्जा देण्यात आला.

II) ६ जुन १९९६ साली केंद्रामध्ये संयुक्त आघाडी सरकार सत्तेवर आले. या सरकारमध्ये इंद्रकूमार गुजराल हे सुरूवातीला परराष्ट्रमंत्री व नंतर पंतप्रधानपदी विराजमान झाले. त्यांनी 'गुजराल सिध्दांता' च्या आधारे भारताच्या परराष्ट्र धोरणात गुणात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. ''सन १९९६ ते १९९८ पर्यंतच्या काळात सुरूवातीला विदेशमंत्री आणि नंतर पंतप्रधान पदाच्या रूपात गुजराल यांचा भारताच्या विदेशनितीवर दबदबा राहिला आहे''[३] त्यांनी आपल्या गुजराल सिंध्दातांच्या आधारे आशियातील शेजारील देशासोबत मैत्रीपूर्ण संबंध वाढविण्यावर भर दिला. यासोबतच भारताच्या आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधाची जपवणूक करण्यासंबंधी विचार मांडले. याचाच भाग म्हणजे इंद्रकूमार गुजराल यांनी भारताच्या आर्थिक व व्यापारी संबंध सुधारण्यावर भर दिला. दक्षिण पूर्व आशियांतील देशांना आशियान या व्यापारी संघाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले होते. तसेच या देशांचे स्थान भारताच्या आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधाच्या दृष्ठीने महत्वाचे होते. यासाठी इंद्रकुमार गुजराल यांनी दक्षिण — पूर्व आशियाईदेशासोबत संबंध सुधारण्याकरीता पूर्वेकडे पहा' या धोरणाचा विकास केला.

''आसियान व्यापार संघाच्या सदस्य राष्ट्रांबरोबर राजकीय संबंध सुधारणे, या राष्ट्रबरोबर आर्थिक आणि व्यापारी सहकार्य वाढविणे आणि या राष्ट्रांबरोबर संरक्षण संबंध प्रस्थपित करणे.''[४] अशी पूर्वेकडे पहा या धोरणाची उद्दिष्ठ्ये ठरविण्यात आली. इंद्रकुमार गुजराल यांनी विकसित केलेल्या या धोरणाचा परिणाम असा झाला की, भारताचे दक्षिण ' पूर्व आशियातील देशासोबत संबंध सुधारले. सोबतच भारताला आसियान या व्यापारी संघात 'पूर्णवेळ सल्लगार भागीदार' असा दर्जा देण्यात आला. याशिवाय 'असियान रिजनल फोरम' या आसियान संघटनेचे संरक्षण व्यासपीठ म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या संघटनेचे सदस्यत्व ही भारताला मिळाले.

III) १९९८ ते २००४ अशी सहा वर्षे केद्रांत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर होते. अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या पंतप्रधान पदाच्या काळात भारतीय परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतल्याचे दिसून येते. ''वाजपेयी यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाला पोकळ आदर्शवादाच्या प्रभावातून मुक्त करून वास्तववादी आणि व्यावसायिक बनविण्याचा प्रयत्न केला.''[५] पी.व्ही.नरसिहंराव व इंद्रकुमार गुजराल यांनी विकसित केलेले पूर्वकडे पहा हे धोरण अटलबिहारी यांनी पूढे चालू ठेवले. म्हणजे त्यांनी दक्षिण — पूर्व आशियातील देशांसोबत संबध दृढ करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. यासंबंधी पंतप्रधान वाजपेयी यांनी २००१ साली व्हिएतनाम व इंडोनेशियाचा दौराच्या वेळी भारताच्या 'पूर्वेकडे पहा' या धोरणासंबंधी महत्वपूर्ण विधान केले होते. ''हा दौरा म्हणजे पूर्वेकडे पाहण्याचा नाही तर पूर्वेकडे पुन्हा पाहण्याची प्रक्रिया आहे.''[६]

भारताच्या सामरिक दृष्टीने महत्वंपूर्ण असलेला आणि भारताला दक्षिण—पूर्व आाशियाला जोडणारा देश म्हणजे म्यानमार होय. या देशाचे उपराष्ट्रध्यक्ष जनरल आई यांनी नोव्हेंबर २००० साली भारताचा दौरा केला. या भेटीमुळे भारत — म्यानमारच्या नव्या संबंधाला सरूवात झाली. नोव्हेबंर २००० साली भारताचे राष्ट्रपती के. आर. नारायण यांनी सिंगापुरला भेट दिली. दक्षिण—पूर्व आाशिया व भारत मैत्रीपूर्ण संबंधाच्या वृध्दीचे व्दार असे सिंगापुरचे महत्व आहे. या भेटीने उभय देशतील पारस्पारिक संबंध मजबुत बनविण्याचा प्रयत्न केला. भारतारच्या पूर्वेकडे पहा धोरणाला चालना देण्यासाठी उभय देशात तीन कराराला मान्यता देण्यात आली. २००१ साली पंतप्रधान आणि उच्यस्तरीय शिष्टमंडळाने दक्षिण — पूर्व आशियातील व्हिएतनाम व इंडोनेशियाचा दौरा केला. यावेळी पंतप्रधान वाजपेयी आणि व्हिएतनामचे पंतप्रधान फान वान रवाईयांच्यात व्दिपक्षीय वआंतरराष्ट्रीय मुद्दयावर चर्चा करण्यात आली. तसेच उभय देशांत परमाणू उर्जेचा शांततापूर्ण उपयोग तथा संस्कृती व कला क्षेत्रासंबंधी तीन व्दिपक्षीयकरारावर स्वाक्षरी करण्यात आल्या. त्यानंतर इडोनेशिया — भारत यांच्यात रक्षासंबंधी महत्वपूर्ण समझौता करण्यात आला. पंतप्रधान वाजपेयी यांच्या काळात मलेशिया,थायलंड, कंबोडिया या देशाशी सबंध सुदृढ करण्याच्या हेतुने विविध स्वरूपाचे करार करण्यात आले. भारताचे दक्षिण पूर्व आशियाई देशामध्ये अधिक सुचीघेण्याचे महत्वपूर्ण उदाहरण म्हणजे मेकॉग—गंगा परियांजना

होय. मेकॉग—गंगा सहकार्य म्हणजे भारताने दक्षिण — पूर्व आशियाई राष्ट्रांसोबत संबंध मजबुत दृष्टी टाकलेले पाऊल समजले जाते.

IV) २००४ साली केंद्रात सत्तातंरण होवून डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार सत्तेवर आले. हे सरकार २००४ ते २०१४ असे सलग १० वर्षे सत्तेवर होते. या सरकारच्या कार्यकाळात डॉ. मनमोहन सिंग यांनी परराष्ट्र धोरणाची सुत्रे मांडली. ''भविष्यातील भारताचे परराष्ट्र धोरण हे भारतातील सामान्य नागरीकांच्या आर्थिक आकांक्षाचे आणि अपेक्षांचे प्रतिनिधीत्व करणारे असेल. भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणात जे स्थान आहे. ते आर्थिक विकासामुळे. त्यामुळे भारत हा आर्थिक विकासाचा कार्यक्रम पुढे चालू ठेवेल आणि त्यासाठी परराष्ट्र धोरणाचा साधन म्हणून वापर करेल.''[७] यावरून लक्षात येते की, डॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्या परराष्ट्र धोरणात आर्थिक विकास, आर्थिक हितसंबंध आणि व्यापार याला प्राथमिकता देण्याचे निश्चित केले होते. त्याचाच एक भाग म्हणजे आसियान या व्यापारी संघाच्या सदस्य राष्ट्रांशी आपले संबंध वृध्दींगत करण्याचा प्रयत्न केला. जुलै २००४ साली ७ देशाचे संघटन असणाऱ्या बिम्सटेकच्या बॅकॉक येथे पार पडलेल्या संम्मेलनात भारताचे नेतृत्व डॉ. सिंग यानी केले. नोव्हेंबर २००४ साली लाओस येथे पार पडलेल्या असियानच्या शिखर संम्मेलनातआशियाई आर्थिक विकास समुहाच्या स्थापनेंसबंधी प्रस्ताव मांडला. भारत आणि आसियान यांच्यात एक ऐतिहासिक करार करण्यात आला. या करारात शांतता, सहकार्य आणि विकास ई. वर भर देण्यात आला होता. तसेच आशियान — भारतातील व्यापार वृध्दीचे लक्ष निर्धारीत करण्यात आले. या शिखर संम्मेलनात डॉ. सिंग यांनी मत मांडले की, ''२१ व्या शतकाला आशियाचे शतक बनविण्यासाठी आसियान आणि भारताला सोबत वाटचाल करणे आवश्यक आहे.''[८] डॉ. सिंग यांनी आसियानच्या ११ व्या शिखर संम्मेलनात (२००५ साली क्वालालांपूर) आसियान — भारत सहकार्य वाढविण्यासाठी प्रस्ताव मांडला तर २००७ साली आसियानच्या ५ व्या शिखर बैठकीत आशियानने मुक्त व्यापार समझोत्याच्या दिशेने पाऊल उचलले पाहिजे, असे मत मांडले.

संयुक्त पुरोगामी आघाडी शासनाच्या काळात पुर्वेकडील देशासोबत द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यास चालना मिळाली. सुरूवातीलाच सिंगापूरने भारताच्या आर्थिक व्यवस्थेतील बदलाला चालना देण्याचे ठरविले. सिंगापूर — भारत या देशात २००५ साली 'भारत — सिंगापूर सर्व समावेशक आर्थिक सहकार्य करार' करण्यात आला. या दोन्ही देशातील आर्थिक व व्यापार संबंधात लक्षात येण्याजोगा विकास झाला. आसियानमधला दुसरा महत्वाचा देश म्हणजे इंडोनेशिया होय. नोव्हेंबर २००५ साली इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष युधोयोनोनी भारताला भेट दिली. या भेटीत दोन्ही देशात मैत्री वाढविण्याचे ठरविले. व त्याप्रमाणे 'न्यू स्ट्रेटेजिक पार्टनशिप' ही योजना आखली होती. तसेच २०१२ साली डॉ. सिंग यांनी म्यानमारला भेट दिली. या भेटीत १२ महत्वपूर्ण करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या.

V) २०१४ साली पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत केंद्रात भारतीय जनता पार्टीचे (रालोआ) नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार सत्तेवर आले. सत्ता स्थानी आल्यापासून नरेंद्र मोदींनी परराष्ट्र धोरणाला विशेष महत्व दिले. ''त्यांनी आपल्या परराष्ट्र धोरणात समृध्दी, स्वाभिमान आणि सुरक्षितता या तीन उद्दिष्टांच्या आधारे स्वयंमस्पष्टता आणली.''[९]नरेंद्र मोदी यांनी आपल्या परराष्ट्र धोरणात दक्षिण—पूर्व आशियाई राष्ट्रांसोबत संबंध मजबूत करण्याला प्राधान्य दिले. पी.व्ही. नरसिंहरावांनी दक्षिण पुर्व आशियांतील राष्ट्रांशी संबंध मजबूत करण्यासाठी 'लुक ईस्ट' चे धोरण स्विकारले होते. या धोरणाला चांगले स्वरूप देण्यासाठी आणि त्याची योग्य रितीने अंमलबजावणी करण्यासाठी मोदी सरकारने या धोरणाचे 'ॲक्ट ईस्ट' असे रूपांतर केले. ''मोदी सरकारने व्यापारी, आर्थिक दृष्टीकोणासोबत संरक्षणच्या दृष्टीने दक्षिण पुर्व आशियाई देशांकडे पाहण्यास सुरवात केली आहे.... दक्षिण पुर्व आशिया हा जगातील आर्थिक आणि व्यापारी व्यवहाराचे केंद्रस्थान बनेल. त्यामुळे त्याकडे केवळ 'लुक ईस्ट' म्हणून त्या भागाकडे पाहू नका तर त्या भागाशी भागीदारी विकासीत करा. ''[१०]अशा प्रकारे ॲक्ट ईस्ट चे धोरण स्विकारले. थोडक्यात ॲक्ट ईस्ट म्हणजे दक्षिण पुर्व आशियाई देशांसोबत आर्थिक, व्यापारी संबंधाबरोबरच उर्जा व संरक्षण इत्यादी क्षेत्रात भागीदारी करण्यास प्राधान्य देणे होय.

ॲक्ट ईस्ट या धोरणांतर्गत भारताचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती पंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री यांनी मागील काही वर्षात आशियाई राष्ट्रांना भेटी दिल्या आहेत. २०१४ साली राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी व्हिएतनामाचा दौरा केला. या भेटीत समुद्री मार्गाच्या संरक्षणाचा करार, उर्जासुरक्षा करार, कृषी क्षेत्रामध्ये समझोत्याचा करार आणि सागरी वाहतूक संबंधीचा करार असे विविध करार झाले. भारताच्या लुक ईस्ट धोरणातील महत्वपूर्ण स्थान असणारे राष्ट्र म्हणजे सिंगापूर होय. भारत — सिंगापूर यांच्यातील राजनैतिक संबंधाला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमिवर २०१४ साली भारताच्या परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी सिंगापूरचा दौरा केला. हा दौरा आर्थिक व सामाजिक दृष्टीकोणातून महत्वाचा मानला जातो. भारत आणि आसियान यांच्यामध्ये व्यापार वाढीसाठी घेण्यात आलेल्या १२ व्या परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित झाले. या परिषदेत व्यापार, संरक्षण, मुक्त व्यापार क्षेत्र आणि सौरउर्जेच्या संदर्भात काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. २०१८ साली भारत — आसियान भागीदारीला २५ वर्ष पूर्ण झाली. या पार्श्वभूमिवर २६ जानेवारी २०१८ साली आसियान या संघातील राष्ट्रप्रमुखासमोर बोलतांना पंतप्रधान नरेंद्र मोदीनी मत मांडले की, ''दक्षिण—पूर्व आशियाबरोबर भारताचे संबंध दोनशे वर्षपिक्षा अधिक जूने आहेत. दोन दशकापूर्वी भारताने भौगोलिक बदलासह स्वत:ला

जगासमोर खुले केले. आणि शतकानुशतके बहाल केलेल्या कौशल्यामुळे ते नैसर्गिकरित्या पूर्वेकडे वळले. त्यामुळे पूर्वेकडील देशांबरोबर भारताचा पुर्नएकात्मीकरणाचा एक नवीन प्रवास सुरू झाला.''[११]

या प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आशियान राष्ट्रांसोबत वाढलेला व्यापार, सहकार्य आणि द्विपक्षीय संबंध इ. बाबतीत मते मांडली. थोडक्यात मोदी सरकारने दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांकडे व्यापार व आर्थिक दृष्टीकोणाबरोबर संरक्षणाच्या दृष्टीने पाहण्यास सुरूवात केली. भारताने स्विकारलेल्या लुक ईस्ट धोरणामुळे संपूर्ण आसियानशी संबंध मजबूत होण्याबरोबरच एक संस्थात्मक चौकटही तयार झाली. तसेच आसियानमधील देश वैयक्तिकरीत्या भारताच्या द्विपाक्षीय संबंधाच्या चर्चेसाठी सहाय्यक ठरले आहेत.

**निष्कर्ष :—**

१) सोव्हियत रशियाच्या पतनानंतर बदलत्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला जुळवून घेण्यासाठी भारताने लुक ईस्ट या धोरणाचा स्विकार केला आहे.

२) भारताने आर्थिक राष्ट्रवादाचा त्याग करून व्यापार वृध्दीचे धोरण स्विकारले, त्यामुळे लुक ईस्ट धोरणाच्या स्विकार केल्याचे दिसून येते.

३) शीतयुध्दोत्तर काळात सत्तेवर आलेल्या पंतप्रधानानी लुक ईस्ट धोरणाचा सातत्याने विकास घडवून आणला.

४) लुक ईस्ट धोरणातंर्गत दक्षिण—पूर्व आशियातील देशांबरोबर संबंध सुधारण्यासाठी पारंपारीक सुरक्षा, व्यापार, उर्जा सुरक्षा, सहकार्य आणि दहशतवाद इ. संबंधी भारताने विविध करार केले आहेत.

**संदर्भ सुची**


१) चंद्रशेखर दिवाण, 'भारताची विदेशनिती,' विद्या प्रकाशन, नागपूर, १९९२, पृष्ठ क्र. ०८.

२) पद्माकर दुभाषी, 'जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण,' श्रीविद्या प्रकाशन, पूणे, पृष्ठ क्र. ६०

३) जे.एन. दीक्षित, 'भारतीय विदेशनीति,' प्रभात प्रकाशन दिल्ली, पृष्ठ क्र. ३४४.

४) शैलेंद्र देवळाणकर, 'भारतीय परराष्ट्र धोरण: सातत्य आणि स्थित्यंतर,' प्रतिमा प्रकाशन, पूणे, २०१० पृष्ठ क्र. ८९.

५) शैलेंद्र देवळाणकर, 'समकालीन जागतिक राजकारण : भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने,' विद्या बुक्स पब्लिसर्स, औरंगाबाद, २०१४ पृष्ठ क्र. ३९

६) राम प्रवेश शर्मा, 'भारतीय विदेशनीति,' यूनिवर्सिटी पब्लिकेशन, नई दिल्ली. पृष्ठ क्र. ४९२.

७) शैलेंद्र देवळाणकर, ' भारत आणि जग : भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा संबंध,' सकाळ प्रकाशन, पूणे २०१४, पृष्ठ क्र. १७.

८) बी.एल.फडिया,' अन्तर्राष्ट्रीय राजनीति : सिंध्दान्त एवं समकालीन राजनीतिक मुद्दे,' साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा, २०१०, पृष्ठ क्र. २४६.

९) लोकराज्य, मे २०१८, पृष्ठ क्र. ०७.

१०) शैलेंद्र देवळाणकर,'भारताचे परराष्ट्र धोरण: नवीन प्रवाह,' सकाळ प्रकाशन, पूणे, २०१७, पृष्ठ क्र. १५९.

११) https://www.pmindia.gov.in/mr/newsupdates/